**Pimpri Chinchwad Police Commissionerate**

**प्रेसनोट दि. २३/०३/२०२०**

**पिपरी-चिंचवड, गुन्हे शाखा युनिट- ४ कडुन घरफोड्या व वाहनचोरीऱ्या करणा-या अट्टल गुन्हेगाराला अटक करुन एकुण- १४ गुन्हे उघड व १५,१३,१५०/- रु. किं. चा मुद्देमाल जप्त**

मा.पोलीस आयुक्त सो, पिपरी-चिंचवड यांनी पिंपरी चिंचवड परिसरात घडणारे घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणुन प्रतिबंध करण्याचे आदेश दिल्याने पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा युनिट ४ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक मोहन शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरिक्षक अंबरिष देशमुख, पो.ना./११८६ मो.गौस नदाफ,पो.शि./२७२० सुखदेव गावंडे, पो.शि./२१०२ प्रशांत सैद यांचे पथक वाकड व सांगवी पोलीस ठाणे परिसरात घडलेल्या गुन्ह्यांचे अनुषंगाने रेकॉर्डवरिल आरोपी तपासुन तांत्रिक विश्लेषन करत असताना पुणे शहर आयुक्तालयाचे रेकॉर्डवरील आरोपी नामे **रफिक हुसेन शेख, वय- २६ वर्षे, राह- गल्ली क्रमांक- १३ ससाणे नगर, हडपसर, पुणे** याने सांगवी व वाकड पोलीस स्टेशन हद्दीत मागिल काही काळात घरफोडीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास वरील पथकाने दि. १७/०३/२०२० रोजी सांगवी परिसरात सापळा रचुन अटक केली. त्यास अटक करुन त्याचेकडे कसोशिने तपास केला असता त्याने मागिल ०८ महिन्यांचे कालावधीत पिंपरी चिंचवड व पुणे शहर परिसरात **घरफोडीचे १२ व वाहनचोरीचे ०२ असे एकुण १४ गुन्हे** केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याचेकडुन त्याने केलेल्य घरफोडीच्या गुन्ह्यांतील चोरीस गेलेले **३६७ ग्रॅम सोन्याचे दागिने, २७९ ग्रॅम चांदीचे दागिने, ०२ चोरीच्या मोटारसायकल, घरफोडीचे साहित्य असा एकुण १५,१३,१५०/- रु कि चा मुद्देमाल** जप्त करण्यात आलेला आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी पुणे शहर आयुक्तालयात घर फोडीचे व वाहन चोरीचे एकुण **२४ गुन्हे** दाखल आहेत.

सदर आरोपी हा दुपारच्या वेळी बाईक वरुन मिश्र लोक वस्तीचे परिसरात फिरुन लॉक असलेल्या बैठया घरांना लक्ष करत असे. त्याच्या कडुन जप्त करण्यात आलेल्या सायकल स्टँड चे सहाय्याने तो मुख्य दरवाज्याचा कडी-कोयंडा उचकटुन व लॉक तोडुन घरात प्रवेश करत होता.

सदर आरोपीकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय-**

१) भोसरी पोलीस ठाणे- गु.र.नं-१७५/२०२० भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
२) वाकड पोलीस ठाणे- गु.र.नं-१९३/२०२० भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
३) वाकड पोलीस ठाणे- गु.र.नं-१२२६/२०१९ भा.दं.वि.कलम ४५४, ३८०

**पुणे शहर पोलीस आयुक्तालय-**

४) भारती विद्यापीठ पोलीस ठाणे- गु.र.नं-६५६/२०१९ भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
५) भारती विद्यापीठ पोलीस ठाणे- गु.र.नं-६७९/२०१९ भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
६) भारती विद्यापीठ पोलीस ठाणे- गु.र.नं-७७०/२०१९ भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
७) भारती विद्यापीठ पोलीस ठाणे- गु.र.नं-२३५/२०१९ भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
८) भारती विद्यापीठ पोलीस ठाणे- गु.र.नं-७९८/२०१९ भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
९) भारती विद्यापीठ पोलीस ठाणे- वाहन चोरी (फिर्यादीने अद्याप तक्रार दिली नाही.)
१०) हडपसर पोलीस ठाणे- गु.र.नं-२३३/२०२० भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
११) हडपसर पोलीस ठाणे- गु.र.नं-६९१/२०१९ भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
१२) हडपसर पोलीस ठाणे- गु.र.नं-६९४/२०१९ भा.दं.वि.कलम ३७९
१३) सिंहगड पोलीस ठाणे- गु.र.नं- ३५६/२०१९ भा.दं.वि.कलम ४५४, ३८०
१४) बिबवेवाडी पोलीस ठाणे- गु.र.नं- ३९०/२०१९ भा.दं.वि.कलम ४५४, ३८०

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. श्रीधर जाधव, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, स.पो.फौ. वासुदेव मुंडे, अदिनाथ मिसाळ, पो.हवा., संजय गवारे, नारायण जाधव, प्रविण दळे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, शावरसिध्द पांढरे, पो. ना. लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, तुषार शेटे, पो. शि. सुनिल गुट्टे, प्रशांत सैद, तुषार काळे, सुरेश जायभाये, गोंविद चव्हाण, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, व नागेश माळी, राजेंद्र शेटे तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा यांनी केली आहे.

**( मोहन दा.शिंदे )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड


गुन्हे शाखा युनिट ४
पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय


गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड